# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट दिनांक २५/१२/२०१९

## शस्त्राचा धाक दाखवुन कार चोरणारे तात्काळ अटक

## ....... निगडी पोलीसांची कामगिरी ..........

निगडी पोलीस स्टेशनचे हद्दीत तसेच पोलीस आयुक्तालयाचे हददीत होत असलेल्या वाहन चोया, जबरी चोया, घरफोडया यागुन्हयांना प्रतिबंध व्हावा, त्या अनुषंगाने मा.पोलीस उपआयुक्त सो‍ा, परि-१ पिंपरी चिंचवड, श्रीमती स्मिता पाटील यांचे सुचने नुसार व निगडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुनिल टोणपे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.राजेंद्र निकाळजे यांनी अधिकारी व कर्मचारी यांना रेकॉर्डवरील गुन्हेगारांना चेक करुन, त्यांचे गैरकृत्यांना आळा बसावा या करीता अधिकारी व कर्मचा-यांची स्वतंत्र टिम तयार करुन त्यांना खब-या मार्फत माहिती काढण्यास वेळोवेळी सुचना देवुन मार्गदर्शन केले आहे.

दिनांक २१/१२/२०१९ रोजी रात्रौ.२१/०० वा ते दिनांक २२/१२/२०१९ रोजी सकाळी ०९/०० वा. चे दरम्यान रात्रपाळी डुटी करीता, यमुनानगर/अजंठानगर बिट मार्शल पो.शि.१९१९ नंदुर्गे, पो.शि.१७०४ मराठे, यांना नेमणेत आले असताना त्यांना दि.२२/१२/२०१९ रोजी पहाटे ०४/०० वा. पोलीस नियंत्रण कक्ष पिंपरी चिंचवड यांचा कॉल प्राप्त झाला की, थॅरमॅक्स चौक येथुन कॉलर यांची पांढरे रंगाची फोर व्हीलर गाडी हत्याराचा धाक दाखवुन जबरदस्तीने चोरुन घेवुन गेले आहे असा कॉल प्राप्त झाल्याने बीट मार्शल यांनी तात्काळ कॉलर यांचेशी संपर्क साधुन गाडी बाबत व आरोपी बाबत माहिती प्राप्त करुन तात्काळ ओटास्किम मार्शल पो.शि.७०२८ केंद्रे व पो.शि.४६२ चेपटे तसेचे प्राधिकरण बीट मार्शल पो.ना.१२९९ कोकाटे,व पो.शि.१४४४ सुर्यवंशी यांना संपर्क साधुन नमुद वाहनाचा शोध घेणेस सांगितले. नमुद वाहनास जीपीएस सिस्टीम असल्याने तांत्रिक माहिती व्दारे लोकेशन घेवुन, कंट्रोल रुमशी संपर्क साधुन सदरचे वाहन बिजलीनगर चिंचवड या ठिकाणी असल्याचे माहिती प्राप्त होताच सदर ठिकाणी यमुनानगर/अजंठानगर बिट मार्शल व चिंचवड मार्शल यांचे मदतीने नमुद वाहन आरोपींसह पहाटे ०४/५० वा. ताब्यात घेवुन, त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने वाहन चालक शिवाजी आप्पासाहेब देवकते वय २९ वर्षे रा. एकता हौसींग सोसायटी, मोरेवस्ती चिखली पुणे यांची फिर्याद नोंद करुन, निगडी पो ठाणे गु.रजि.नं.१०५१/२०१९ भा.द.वि.कलम ३९४,५०४,५०६,३४ आर्म ॲक्ट ४(२७), म.पो.ॲक्ट क ३७(१)(३)१३५ या गुन्हयात आरोपी १) यश सुरेश शेजवळ वय २० वर्षे रा. ज्ञानेश्वर कॉलनी, घर नं.१, पिंपळाचे झाडाजवळ, आकुर्डी, पुणे,२) अजय राजू लांडगे वय २० वर्षे रा. १७०, ज्ञानेश्वर कॉलनी, सेंट्रल बॅंकेच्या बाजूला, टायरच्या दुकानामागे पहिले घर, आकुर्डी, पुणे ३) अनिकेत गौतम शिंदे वय १९ वर्षे रा. पिरंगुट चौकी समोर, पौड रोड, मुळशी, पुणे यांना अटक करुन व एक अल्पवयीन मुलगा यास ताब्यात घेवुन, त्यांचेकडुन गुन्हयात चोरी गेली इंडीका कार नं. एम. एच.१२/एन.बी.४०३७ व एक लोंखडी तलवार असा किं.रु.३,००,१००/- माल हस्तगत करणेत आला असुन, दाखल गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक श्री. लक्ष्मण सोनावणे हे करीत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त सो‍ा, पिंपरी चिंचवड,श्री.संदीप बिष्णोई, मा.सह पोलीस आयुक्त सो‍ा, पिंपरी चिंचवड, श्री.प्रकाश मुत्याल मा.अप्पर पोलीस आयुक्त सो‍ा, पिंपरी चिचंवड,श्री. रामनाथ पोकळे, मा. पोलीस उपआयुक्त सो‍ा.परि-१, पिंपरी चिचंवड,श्रीमती स्मिता पाटील, मा.सहायक पोलीस आयुक्त सो‍ा, पिंपरी विभाग श्री. रामचंद्र जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुनिल टोणपे, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.राजेंद्र निकाळजे, सपोनि लक्ष्मण सोनावणे, शंकर बांगर, विनोद होनमाने, सतिश ढोले, तुषार गेंजगे,भुपेंद्र चौधरी,विलास केकाण, पो.शि.७०२८ केंद्रे, पो.शि.४६२ चेपटे, पो.ना.१२९९ कोकाटे, पो.शि.१४४४ सुर्यवंशी, पो.शि.२०८९ उबाळे चिंचवड पो.स्टे,पो.शि.२०२५ कांबळे चिंचवड पो.स्टे,पो.ना.१२५६ माखाडे चिंचवड पो.स्टे,हामगार्ड तावरे चिंचवड पोस्टे,यांनी केली आहे.






पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय


पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय



